## उपविभागीय दंडाधिकारी यांनी करावयाची हद्दपार कारवाई

- मुंबई पोलीस अधिनियम ५५: व्यक्तींच्या टोळ्या व जमाव यांची पांगापांग करणे: हे कलम 'टोळी' शी संबंधीत आहे. टोळी म्हणजे दोन पेक्षा जास्त इसम अशी व्याख्या कायद्यात आहे. एखादी टोळी एखाद्या क्षेत्रात फिरत असल्यामुळे किंवा तळ देऊन राहिल्यामुळे तेथील कायदा व सुव्यवस्थेस धोका निर्माण झाला आहे व त्या टोळीचा बेकायदेशीर रितीने वागण्याचा संशय निर्माण झाला आहे. या कलमाखाली कारवाई करतांना वर्तमान परिस्थितीचा (Present tense) विचार करावा. यासाठी टोळीचा म्होरक्या निश्चित करून त्याला नोटीस पाठवावी. एकापेक्षा जास्त म्होरके असतील तर सर्वांना नोटीस पाठवावी. ही कारवाई प्रतिबंधात्मक कारवाईत मोडते. पोलीसांनी नमुद केलेला टोळीच्या वास्तव्याचा काळ तसाच गृहित धरू नये. त्यामुळे बुध्दिचा वापर केला आहे असा न्यायालयास दिसुन येत नाही. ही वेळ ठरवणेसाठी खात्री करावी, यात स्वेच्छाधिकार वापरण्यास मुभा आहे. या कलमाखाली कारवाई करणेसाठी ठोस कारण हवे. फक्त पोलीस अहवालावरून कारवाई झाली असे दिसुन येऊ नये. या कलमान्वये कारवाई करून काढलेला आदेश हा वाजवी (reasonable) असावा.

- मुंबई पोलीस अधिनियम ५६(१): अपराध करण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींना काढुन लावणे: या प्रकरणांत 'बेतात असलेल्या व्यक्तींना' (About to commit) हा शब्द महत्वाचा आहे. कोणत्याही व्यक्तीच्या हालचाली किंवा कृत्ये यांपासून इतर व्यक्तीस/मालमत्तेस भय, धोका, ईजा होण्याचा संभव आहे त्यामुळे त्यांना काढुन लावणे. या कलमाखाली कारवाई करतांना वर्तमान परिस्थितीचा (Present tense) विचार करावा. तसेच अशा व्यक्तीची गुन्हा करण्यासाठीचा सहभाग (involvement), ताकद (Force), बळजबरी/जुलूम (violence) याचाही विचार करावा. या कलमाखाली अपराधसिध्द व्यक्तीला राज्याबाहेर घालवुन देता येते, त्याने कोणत्या मार्गाने/रस्त्याने जावे हे आदेशात नमुद करता येते, पुन्हा परतण्याबाबतची योग्य ती अट लादता येते.

- मुंबई पोलीस अधिनियम ५६(२): या कलमान्वये हद्दपार केलेल्या व्यक्तीवर तो ज्या ठिकाणी जात आहे तेथील सक्षम अधिकाऱ्यास त्याचा रहिवासाचा पत्ता कळविण्याची अट लादता येते.हद्दपार आदेशात ही अट नमुद करता येते.

- मुंबई पोलीस अधिनियम ५७: विविक्षित सिध्ददोष व्यक्तींना या कलमान्वये घालवुन देता येते. यातील प्रमुख बाब म्हणजे न्यायासंबंधी व सरकारी स्टँप संबंधी अपराध (भा.दं.सं. प्रकरण १२)/मनुष्याच्या शरीराच्या व जीवाविरूध्द अपराध (भा.दं.सं. प्रकरण १६)/मालाच्या विरूध्द अपराध (भा.दं.सं. प्रकरण १७)/ मुं.दा.अ./स्त्रीया व मुली यांचा अनैतिक व्यापार/ सिमा शूल्क अधिनियम/जुगार प्रतिबंधक कायदा/ रेल्वे मालमत्तेचे नुकसान या संबंधी अपराधात दोन किंवा जास्त वेळा दोषी ठरवण्यात आले असेल तर घालवुन देता येते. 'दोष सिध्दी'

(Conviction) व वर नमुद गुन्ह्याचे प्रकार येथे महत्वाचे घटक आहे. त्याने अलिकडच्या काळात शिक्षा भोगलेली असावी.

- मुंबई पोलीस अधिनियम ५७ अ: भिकारी म्हणून घोषित केलेल्या व्यक्तिस घालवुन देणे. या कलमान्वये कारवाई करतांना सुनावणी आणि तपासणी महत्वाची आहे. या प्रकारचा आदेश काढण्यापूर्वी संबंधीत व्यक्तिला सरकारी बांधकामावर अथवा अन्य ठिकाणी नोकरी स्विकारण्याचा विकल्प देऊ केलेला असावा. सदर व्यक्ती कोणत्याही वैध नोकरी/व्यवसायात स्वतःला गुंतवुन घेण्याची शक्यता नाही याची खात्री पटणे आवश्यक आहे.

- तडीपार प्रकरणात सामनेवाला याला सुनावणीची संधी देणे, त्याचे म्हणणे ऐकुन/नोंदवुन घेणे, त्याला आदेश बजावणे या गोष्टी महत्वाच्या ठरतात.

- तडीपार करण्याची मुदत सर्वसाधारणपणे दोन वर्षापेक्षा जास्त नसावी.

- तडीपारीचा अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यामार्फत प्राथमिक चौकशी करावी. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर स्वतः सुनावणी घ्यावी.

- सामनेवाला याने सुनावणीसाठी हजर रहावे म्हणून बाँड घेता येतो. तरीही तो गैरहजर राहिल्यास त्याच्या गैरहजेरीत आदेश काढता येतो.

- तडीपारीच्या आदेशाविरूध्द तीस दिवसाच्या आत शासनाकडे अपील दाखल करता येते.

- मुंबई पोलीस अधिनियम ६२: तडीपारीचा आदेश बजावुनही एखादी व्यक्ती स्वतः निघुन जाण्यास कसूर करेल किंवा निघुन गेल्यानंतर ज्या क्षेत्रातुन काढुन टाकले आहे त्या क्षेत्रात विनापरवाना  प्रवेश करेल त्याला ज्या क्षेत्रातुन काढुन टाकले आहे त्या क्षेत्राबाहेर पोलीस अभिरक्षेत ठेवता येईल.

- मुंबई पोलीस अधिनियम ६२ (२): जी व्यक्ती तडीपारीच्या आदेशान्वये त्या क्षेत्रातुन निघुन गेली आहे त्या व्यक्तीला त्या क्षेत्रात येण्याची तात्पुरती परवानगी देता येते. अशी तात्पुरती परवानगी देतांना काही अटी लादता येतात. या अटींचा भंग झाल्यास अटक करता येऊ शकते. शक्यतो धार्मिक विधींसाठी लगेच परवानगी द्यावी.